आवटो. 19




Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTM University jointly Organized

# One day Interdisciplinary National Conference on

## साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे

### व्यक्तित्व : साहित्य आणि तत्त्वज्ञान

**1st October, 2019**




Organized By:

**Department of Marathi**

Shri Sharda Bhavan Education Society's

**Rajiv Gandhi Mahavidyalaya,**
**Mudkhed, Dist. Nanded-**
**Maharashtra -India**



Edited by

Dr Ramesh Kadam

Dr Madhav G. Baswante

Mr Sandeep Korde

| | | |
|---|---|---|
| ४८. | अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे- डॉ.शैलश पांडुरंग कांबळे | १४१ |
| ४९. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजभान-हरिअंबीरे प्रदीपकुमार मारोती | १४६ |
| ५०. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील व्यक्तिरेखा-श्री वृंदावन निवृत्ती नामवाडे | १४९ |
| ५१. | अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यलेखन विषयक विचार-प्रा. अरुण डी. मोरे | १५२ |
| ५२. | अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी विश्व-बनकर माणिक नामदेव | १५४ |
| ५३. | प्रबोधक साहित्यिक : अण्णा भाऊ साठे-डाखोरे ज्ञानेश्वर काशिनाथराव | १५८ |
| ५४. | 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवासवर्णनाचा शैली वैज्ञानिक अभ्यास-प्रा.गायकवाड देविदास बाबुराव | १६१ |
| ५५. | अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य : एक अभ्यास-डॉ.पंढरी डोईफोडे | १६४ |
| ५६. | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री प्रतिमा-प्रा. कैलास तातेराव गवळी | १६६ |
| ५७. | अण्णा भाऊ साठे : जातपितृसत्तेला सुरुंग लावणारी वैजयंता कादंबरी-आरती केशवराव गायकवाड | १६९ |
| ५८. | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायक- प्रा.डॉ.नरसिंग कदम | १७२ |
| ५९. | अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व-प्रा.डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | १७५ |
| ६०. | अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी विश्व-प्रा. कृष्णा सुदाम इंगळे | १८० |
| ६१. | अण्णा भाऊंची शाहिरी कविता - पोवाडे-प्रा. नवनाथ निवृत्ती बेडे | १८३ |
| ६२. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथात्म साहित्यातील वंचितांचे जीवन- डॉ. संजय प्रकाश बालाघाटे | १८६ |
| ६३. | अण्णा भाऊ साठे यांच्या वाङमयातील स्त्री प्रतिमा - हर्षवर्धन सं. कोल्हापूरे | १८९ |
| ६४. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे संदर्भ - डॉ. प्रदीप औजेकर | १९२ |
| ६५. | अण्णा भाऊंची 'माझी मैना गावावर राहिली' - प्रा. डॉ. संभाजी बाबाराव सावंत | १९५ |
| ६६. | अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक व सामाजिक विचार - प्रा. डॉ. हरिहर शिवदास मोहोकार | १९७ |
| ६७. | अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक, राजकीय व आर्थिक विचार - प्रा. सदाशिव राजाराम भुयारे | १९९ |
| ६८. | क्रांतिकारी साहित्यिक - अण्णा भाऊ साठे - डॉ. लहू दिगंबर वाघमारे | २०४ |
| ६९. | शाहिरांचा शिरोमणी : अण्णाभाऊ - प्रा.दत्ता म.बडुरे | २०९ |
| ७०. | 'फकिरा'तील व्यक्तिरेखांचे स्वरुप - प्रा.डॉ.संजय हापगुंडे | २११ |
| ७१. | साहित्यकलेतील उत्तुंग मनोरा : अण्णा भाऊ साठे - प्रा. डॉ. गोविंद शंकरराव रामदिनेवार | २१५ |
| ७२. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील परिवर्तनवाद - प्रा.डॉ. एन.के. वाघमारे | २१९ |
| ७३. | अण्णा भाऊ साठे यांचे प्रवासवर्णन - प्रा.डॉ.अगदाळे किरण आगतराव | २२१ |


ISBN : 978-81-922248-7-9

ISBN : 978-81-922248-7-9

**© Copyright**
Prinpcipal
RAJIV GANDHI MAHAVIDYALAYA
Mudkhed, Dist. Nanded, Maharashtra, India

**Edited by**
Dr Ramesh Kadam
Dr Madhav G. Baswante
Mr Sandeep Korde

**Publisher**
Narayanrao Chavan Law College
Nanded, Maharashtra, India

**Printed at**
Mudra Offset Printers & Processors
M.G. Road, Nanded. Ph. : 242109

9 788192 224879

ISBN : 978-81-922248-7-9

# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य : एक अभ्यास

**डॉ.पंढरी डोईफोडे**
सहयोगी प्राध्यापक
संत भगवान बाबा महा.
सिंदखेडराजा बुलडाणा

लोक साहित्यीक अण्णाभाऊ साठे यांनी मानवतावादी भुमिका घेऊन लेखन केले. शाहिरी केली. अण्णाभाऊंनी सामाजिक, सांस्कृतिक जीवनात आपल्या लेखनीव्दारे दलित, उपेक्षित माणासांच्या मनात अंगार फुलवला. त्यंच्या साहित्यातुन दलित, उपेक्षित भटक्या माणसाला जगण्याची ऊर्मी मिळते. अण्णाभाऊंनी साहित्यातून वाचकांच्या मनात स्वाभिमान, अभिमान जागृत करून दिला. मानवी न्याय हक्कासाठी व्यवस्थेशी झगडण्याचा दुर्दम्य आशावाद अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून निर्माण केला. अण्णाभाऊंनी आपल्या विविध पुस्तकांना प्रस्तावना लिहील्या आहेत. त्यामधून त्यांचा वाड्मयीन दृष्टीकोन स्पष्ट होतो. मानवयुक्ती लढ्याकडे डोळस दृष्टीने पाहण्याची आणि प्रबळ वर्ग जाणिवांच्या संघटीत धुरिणतत्वाच्या, परिवर्तनाच्या लढ्यात अग्रेसर राहण्याची एक सम्यक दृष्टी मानवाला आपल्या विचार पध्दतीतून दिली आहे. कामगार कष्टकरी वर्ग हा क्रांतीचा अग्रदुत आहे. मानवाच्या अनादी काळापासून मुक्ती लढ्याचे हे अंतिम ध्येय आहे. आजवरच्या इतिहास हा गुतागुंतीच्या वर्गयुध्दाचा इतिहास आहे.

प्रखर युक्तीवाद, समता, स्वातंत्र्य, विश्वबधुत्व व समाजवादी विचार यांच्या वैचारीक सधनतेवर अण्णाभाऊंचा वाड्मयीन दृष्टीकोन उभा आहे. अन्याय, शोषण पिळवणूक यांना ते विरोध करतात. क्रांतीसुक्ते गाव गाव आशावादीची गिरीशिखरे वास्तवात उभी करण्याचा प्रयत्न करणे हे अण्णाभाऊंच्या समाज विचार प्रणालीचे सुत्र आहे. त्याची दृष्टी पुरोगामीपणाला सत्त आवाहन करणारी आहे. मार्क्स बरोबर शाहु, फुंले, आंबेडकरांच्या विचारांचाही सहभाग आण्णाभाऊंच्या वाडमयीन दृष्टिकोनात आहे. अण्णाभाऊंच्या पुर्वीच्या काळात जीवनात इतके भेसुर, इतके भयानक दारिद्रय असते, भुकेसाठी व जगण्यासाठी माणूस इथल्या जनावराशी लढू शकतो, हे तत्कालीन मराठी साहित्याला माहित नव्हते. एका अनोखा जगाचा, संस्कृतिचा परिचय अण्णाभाऊंनी करून दिला हा संस्कृतीचा आत्मा आहे. जी जीवन जगण्याची धडपड चालू आहे त्या जीवनातील भीषण नाट्य पकडून त्यातील दाहकता उत्करता, दौद्रता आणि अंगतिकता चांगलीच प्रत्ययाला येते. अण्णाभाऊ ज्या जातीत वाढले, मोठे झाले, त्याचे सारे विशेष त्यांच्या साहित्यात ठिकठिकाणी जाणवतात. वारणाखेरा, त्यातील लोकजीवन, त्यातील संघर्ष, धीरोदात्तपणा तेथील माणसांची, झुंजारवृत्ती सत्यवचणी बाणा, बंडखोर पणा, उदारवृत्ती या साऱ्या गोष्टी अण्णाभाऊंनी टिपकागदा सारख्या टिपून घेऊन कथा, कादंबऱ्यातुन व्यक्तीच्या माध्यमातुन उतरविल्या. असा कलावंत म्हणजे एक प्रकारे समाजसुधारकच असतो. समाजाला काहीतरी सांगीतले पाहिजे, ही उर्मी कलावंताला गप्प बसू देत नाही. तसाच प्रकार अण्णाभाऊंच्या बाबतीत घडला आणि अण्णाभाऊंनी मराठी साहित्यक्षेत्रात ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १३ वननाट्य, ३ नाटके, १ शाहिरी पुस्तक, १ प्रवासवर्णन, ७ चित्रपटकथा, १५ पोवाडे इतके साहित्य निर्माण करून मराठी साहित्यविश्वात मानाचे स्थान मिळविले. जीवनात मंगल स्वप्न पाहणाऱ्या या कलावंताला जेंव्हा त्याच्या क्षेत्रात अपंगत्वता, विद्रुपता दिसली तेंव्हा त्यांची लेखणी बंड करून उठते. त्यांनी फक्त लोकांचे मनोरंतन करण्यासाठी लिहीले नाही तर जनमानसाच्या मनात जगण्याविषयीचा दुर्दम्य आशावाद निर्माण करण्यासाठी साहित्याची निर्मिती केली.

तत्कालीन समाजाला माहित नसणारे जग, त्यांची दु:खे, त्यांचे दुभंगलेपण मांडले. त्या माणसांना जगण्याचे बळ देणारे विषय मराठी कथा-कादंबरीत दिले. त्यांची नाटके, लोकनाट्ये, पोवाडे असतील यातून त्यांनी माणयांचे जगणे दु:ख, वास्तवरूपात मांडले, त्यातुन त्यांनी आदर्शच मांडला. लोक नाट्यातील सुरवातीच्या गणात 'गणेशनमना' ऐवजी माणसाला गौरव केला. हा बदल फारच क्रांतीकारकच होता. तर अण्णाभाऊंच्या पोवाड्यात महाराष्ट्राचा इतिहास, समाजजीवन, मातृभुमीचा गौरव आहे. तसा शौर्याचा अभिमान तसेच त्याचे स्वतंत्र असे मनोगत असे. अण्णाभाऊंचे पोवाडे लावण्या, लोकनाट्ये ही सर्व कला जनप्रेमातून, जनक्षेत्रातून, जनप्रक्रियेतून निर्माण झालेली असून ती जनतेलाच अखेर अर्पण केलेली आहे. असे अनेक विध विषय मराठी साहित्याला अण्णाभाऊंनी दिले. एक प्रकारचे वैचारिक अधिष्ठान दिले आहे. मराठी चित्रपट सृष्टीला अण्णाभाऊंनी आपल्या कलात्मक चित्रपटकथा देऊन मराठी चित्रटाचा दर्जा उंचावण्याचे कार्य केले आहे. मराठी आणि मानवी जीवनाला सुध्दारणावादी, समतावादी विचारसरणी देऊन मराठी साहित्य संपन्न केले आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या यादीत आपल्या मानवतावादी लेखनाने साहित्याने आपले नाव अधोरेखित केले आहे.

अण्णाभाऊंनी स्त्री आणि पुरूष हा भेद मानला नाही. मुळात त्यांना हा भेदभाव मान्य नाही. स्त्रीयांचा आदर करावा त्यांचा सन्मान करावा. त्यांचा गौरव करावा. स्त्री आणि पुरूष


ISBN : 978-81-922248-7-9

यांच्यात भेद करू नका म्हणून त्यांच्या साहित्यात आलेली नायिका आगळी वेगळी आहे. त्यांच्या साहित्यातील नायिका ही अबला नाही. शोषणाला बळी पडत नाही. अगदी बिकटप्रसंगी ताठ मानेने उभी राहते. धाडस दाखवून अन्यायाचा प्रतिकार करते उदा.म्हणून आपणास चंदन आणि चित्रा या नायिका सांगता येतील. अण्णा भाऊंनी कामगार म्हणून जगत असतांना येणारे दुःख पुरूष कामगारांच्या तुलनेत किती भयानक असते याचे हृदयस्पर्शी चित्रण अण्णाभाऊ करतात. या नायिकेचा सन्मान करतांना आयटकच्या कार्यकर्त्या डॉ.पार्वतीबाई म्हणतात चंदना ही मुंबईतील बिटीया मिलच्या संपाच्या पार्शभुमीवर एका रणरागीणीची कहाणी. ही कादंबरी लढाऊ स्त्री जीवनावर आधारलेली आहे. चिखलातील कमळ ही कादंबरी मुरलीच्या जीवनावर आधारीत आहे. अण्णाभाऊंची कथा वेगळ्या अंगाची व ढंगाची आहे. त्यांच्या कथा साहित्याने मराठी कथा समृध्द केली आहे हे सत्य नाकारता येत नाही. आशय विषय वातावरण उद्देश व पात्र या कथा रचनेतील महत्वाचा घटक कथांचे निराळेपणा सिध्द केले आहे. त्यांच्या कथा ह्या भूक या केंद्रबिंदुशी निगडीत आहेत. भुकेसाठी कथेतील पात्रे कोणत्याही स्तरावर जासऊ शकतात. अण्णाभाऊंची कथा ही जीवनातील कठोर वास्तवाला कशी सामोरी जाते याचे प्रत्यंतर सर्व कथेमधून दिसून येते. अण्णा भाऊंनी कथेतून गावगाडा अभिव्यक्त केला आहे. प्रसिध्द लेखक प्रा.डॉ.प्रकाश कुंभार यांनी अण्णा भाऊंच्या गावगाडावर प्रकाश टाकला आहे. तर रा.ग.जाधव म्हणतात अण्णा भाऊंनी स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कथा- कादंबरी नव्या चैतन्याने नव्यारूप समृध्दीने, नव्या प्रेरणांनी रूपास आली. ग्रामीण प्रादेशीक जगाचे नि उपेक्षीतांचे अंतरंग व बहिरंग त्यातून साकार झाले आहे.

अण्णाभाऊंची लोकनाट्य ही पूर्वीच्या लोक कला प्रकारात बसत नाही. पूर्वी लोकनाट्य हा कला प्रकार रंजनासाठी करमणुकीसाठी सादर केला जात होता. परंतु अण्णाभाऊंनी लिहिलेली आणि सादर केलेली लोकनाट्य ही सामाजिक विषमतेवर, दंभावर आधारीत आहे. संयूक्त महाराष्ट्र चळवळीवर त्यांनी माझी मुंबई हे लोकनाट्य रचले आणि सादर केले. राष्ट्रद्रोही राजकारणांनी मुंबई ही गुजरातला जोडण्याचे ठरविले होते. परंतु अण्णाभाऊंनी अशा भोंदु, स्वार्थी, ढोंगी राजकारण्यावर व मुंबई शासनावर लेखणीचे फटकारे काढले होते. त्यामुळे हे लोकनाट्य बंद पाडण्यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केले होते. प्रखर बुध्दिवाद, समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व व समाजवादी विचार यांच्या वैचारीक सधनतेवर अण्णाभाऊंचा वाड्मयीन दृष्टीकोन असा आहे अन्याय, शोषण, पिळवणूक यांना ते विरोध करतात. क्रांतीसुक्ते गात गात आशावादीची गिरी शिखरे वास्तवान उभी करण्याचा प्रयत्न करणे हे अण्णाभाऊंच्या समाज विचार प्रणालीचे सुत्र आहे.

**निष्कर्ष :**

१) केवळ सहानुभुतीपोटी दलित, उपेक्षितांचे जीवनचित्रण न करता प्रसंगी प्रक्षोक्त आणी विद्रोहाने दलित, उपेक्षित मानसाच्या मनात अंगार फुलविण्याचे कार्य अण्णाभाऊंनी केले.

२) अण्णाभाऊंच्या साहित्याची प्रेरणा मार्क्सवादी व अंबेडकरवादी विचारधारा असल्याचे त्यांच्या साहित्यावरून जाणवते.

३) मराठी साहित्याला माहित नसणाऱ्या नायक-नायिका दिल्या. चारित्र्यवाद, शीलवान, देशाभिमान, संस्कृती जपणाऱ्या, माळराणावरच्या भटकंती करणाऱ्या, शेतात बांधार राबणाऱ्या स्त्रियांचे वेगळे विश्व जगासमोर आणले.

४) क्रांतीसुक्ते गात गात आशावादीची गिरीशिखरे वास्तवात उभी करण्याचा प्रयत्न करणे हे अण्णाभाऊंच्या समाजविचार प्रणातीचे सुत्र आहे.

**संदर्भ :**

१) डांगळे अर्जुन, संपा.लोकशाहिर अण्णाभाऊ साठे निवडक वाड्मय म.रा.सा.आणि सं.मंडळ, मुंबई,२००६

२) डॉ.माधव रा.पानेदार - शाहीर अमरअण्णा - प्रकाशक अनुबंध प्रकाशन, २०२, बालाजी कॉम्पलेक्स, पुणे-२००४

३) आसाराम गायकवाड, संपा.लोकशाहीर तथा लोककलेखक अण्णाभाऊ साठे प्रकाशक सौ.शुभांगी कन्नडकर नाशिक,१९९६


ISBN : 978-81-922248-7-9